

१९७५ नंतरच्या काळात समाज ज्या सांस्कृतिक संक्रमणातून जात होता, त्या समाजाचे निरीक्षण अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय झाले. मग त्यात पुरुषसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीची परवड जशी आली तसेच गिरणी कामगारांचे प्रश्न आले, खेड्यांची वाताहत आली; शहरांकडे मोठ्या आशेने वळलेले ग्रामीण तरुण आले; त्यांचे भ्रमनिरास आले; महानगरातल्या झोपडपट्ट्या आल्या; वेश्यावस्ती आली; गुंडांचा मोकाट वावर आला; सत्ताकारण आले; अर्थकारण आले, भ्रष्टाचार आला. संस्कृतीचा सगळा चेहरामोहराच बदलून गेला. ह्या बदललेल्या संस्कृतीचे माणसाला उद्ध्वस्त करणारे चित्र जयंत पवारांच्या 'काय डेंजर वारा सुटलाय' ह्या नाटकात पाहायला मिळते.

हतबलता ही लेखनाची प्रेरणा होऊ शकते का? मला माहीत नाही. पण ही हतबलतेची जाणीव इतकी वाढत गेली की स्वतःशीच बंड केल्याप्रमाणे ती झटकून टाकण्यासाठी कधीतरी मी लिहायला बसलो.

ते हे नाटक. 'काय डेंजर वारा सुटलाय!'

'अधांतर' हे माझं नाटक मी सात वर्षं लिहीत होतो. परत परत खर्डे करत होतो. 'डेंजर वारा'चंही जवळपास तेच झालं. पहिली दोन वर्षं आणि नंतर एक गॅप येऊन गेल्यानंतर पुन्हा सहा वर्षं, अशी आठ वर्षं हे नाटक मी पुनः पुन्हा वेगवेगळ्या पद्धतीनं लिहीत होतो. तरीही दरवेळी काहीतरी राहून जात होतं; काही निसटत होतं; चिमटीत आलेलं इतकं पसरत होतं की ते आटोक्यात कसं आणायचं या कल्पनेने आणि त्यासाठी केलेल्या प्रयत्नांत दमछाक व्हायची.

दमछाक व्हायची; कारण समोर मोठा गुंता पडलेला असायचा वास्तवाचा.

या गुंत्यातून आपल्याला हव्या त्या आशय-विषयाचा तलम धागा निवडून त्याची तरल मांडणी करणं हेही एक कौशल्यच आहे. पण का कोण जाणे, मी सहसा तसं केलेलं नाही. मला ते स्वार्थीपणाचं वाटत आलंय. माझ्यातल्या लेखकाच्या जपणुकीसाठी केलेला स्वार्थीपणा. मला तो सगळा गुंताच महत्त्वाचा वाटतो. समग्र वास्तव समजून घेणं गरजेचं वाटतं. ते पेलवणार नाही, हे तर पहिल्यापासून जाणवत असतं, पण माझी स्वतःपासून सुटका नसते. ते उरावर घेतल्याशिवाय मला चैन पडणार नसतं. लेखक म्हणून माझा खूप काळ अंधारात चाचपडण्यात, धडपडण्यात, ठेचकाळण्यात जातो. या सर्व काळात वास्तवाचे पदर इतके पसरत जातात की आपल्याला काहीच कळत नाही, हेच अधिकाधिक कळत जातं. पण गोष्टी स्वतःपुरत्या सोप्या करण्यापेक्षा त्या स्वतःसाठी जास्तीत जास्त अवघड करून ठेवणं, हीच जर माझी खोड असेल तर त्यातून माझं लेखन तरी सुटणार कसं?

'काय डेंजर वारा सुटलाय'ही ह्या त्रासातून सुटलं नाही.

१९९५ च्या थोडा आधीचा काळ आहे. गिरणी संपानंतर सुरू झालेल्या गिरण्या पुन्हा बंद पडल्या होत्या आणि कामगारांची थकित देणी देण्यासाठी गिरणीमालक आपल्या ताब्यातल्या गिरण्यांच्या जमिनींचा अधिकाधिक हिस्सा विकण्याची परवानगी सरकारकडे मागत होते. सरकारनेही मुंबईच्या शहर विकासनियंत्रण नियमावलीत (डीसी रूल) साळसूदपणे बदल करून व्यावसायिक कारणासाठी एकूण जमिनीचा एक तृतीयांश भाग विकायला गिरणीमालकांना परवानगी देताना त्यात निवासी संकुलं उभी करण्याची परवानगी गुपचूप देऊन टाकली. तीच वेळ होती मुंबई महानगरीत रिअल इस्टेटचा धंदा तेजीत येण्याची. जागांना सोन्याचे भाव येण्याची.

हा तोच काळ आहे, जेव्हा राज्यात सत्ताबदल होऊन एक राजकारणी केवळ बिल्डर लॉबी, उद्योजक आणि उद्योगपती यांच्या दबावामुळे राज्याचा मुख्यमंत्री झाला. शिक्षकी पेशापासून सुरुवात करून मुख्यमंत्रीपदापर्यंत पोचलेल्या या माणसाच्या सत्ताकाळात त्याच्याच मतदार संघातल्या अनेक शाळा बंद पडून त्या जागांवर कमर्शियल कॉम्प्लेक्स उभे राहिले.

त्याच काळात मुंबईतल्या मध्यवस्तीत एका पापभीरू मध्यमवर्गीय इसमाचा फ्लॅट बळकावण्याच्या प्रयत्नात त्या इसमाचा संशयास्पद मृत्यू झाला आणि तो खून असल्याचा आरोप होऊन त्या प्रकरणात एका युवा नेत्याचं नाव गोवलं गेलं. त्याच काळात मी 'लोकसत्ता' या दैनिकात नोकरी

# एका गुंत्याचा गुंताडा

'मुंबई तू हरवून बसलीस स्वतःची सिंफनी।किती लपवून ठेवशील आंतर्वाद्य।
मला शेवटच्या बीभत्साची गाणी गायचीयेत' या नामदेव ढसाळने मांडलेल्या आकांतातला पीळ
मला जाणवू लागला. शाहीर अमर शेखांच्या 'सुटला वादळी वारा।वल्हव जोमानं जरा।चल गाठू किनारा'
या जोषपूर्ण गीतातल्या वादळी वाऱ्याचा विपरित अर्थ मला दिसू लागला.
शाहिरांना अभिप्रेत असलेला 'क्रांतीचा वारा' आज 'भयाचा वारा' होऊन वाहत होता,
जो मला एका तार्किक संगतीने अरुण कोल्हटकरांच्या 'डेंजर वाऱ्या'पाशी घेऊन आला.
ही झाली नाटकाची पहिली फेज. मध्ये तीन वर्षांची गॅप पडली.
संहितेत एका ओळीची मी भर टाकली नाही; पण डोक्यात विषय धुमसत होता.

करत होतो. एक दिवस दैनिकाच्या कार्यालयात आमचा मुख्य वार्ताहर दुसऱ्या वार्ताहराला सांगताना मी ऐकत होतो की, कुलाबा-कफ परेड भागात लोकांच्या जागा बळकावल्या जातात. पोलिसच हे फ्लॅट खाली करून देण्याची सुपारी घेतात. त्यासाठी त्यांचा रेट आहे पाच लाख रुपये.

मुंबईत लोकांच्या जागा बळकावण्याचे प्रकार पूर्वापार होत होते; पण आता हे लोण वाढत मध्यमवर्गीय निरुपद्रवी लोकांच्या उंबरठ्यापर्यंत आलं होतं.

आणि, आयुष्यात आपल्याला राहायला किमान एक साधी जागा मिळावी आणि ती टिकावी यासाठी जिवाचं रान करणारी माणसं तर मी खुद्द माझ्याच आयुष्यात पाहिली होती. त्यांच्या यातनांचा आणि तडफडाटांचा मी असहाय साक्षीदार होतो.

ह्या सगळ्यांतली अस्वस्थता अंगावर घेऊन मी एकांकिका लिहिली. तिने काही काळ मला समाधान दिलं; पण लवकरच मला वाटू लागलं, हे फार फार तोकडं आहे. कारण ही केवळ घुसखोरांची आणि बेघर झालेल्या एका माणसाची गोष्ट नाही; ही या शहराचीही गोष्ट आहे. माझ्या एका मित्राच्या आग्रहावरून आणि स्पर्धेच्या गरजेसाठी मी एकांकिकेचं नाटक लिहिलं, तेव्हा त्यात बेघर होणाऱ्या नायकाच्या गोष्टीबरोबर एक कवीही होता. या शहराच्या वळचणीला बसून महाशब्द लिहिण्याचा प्रयत्न करणारा हा कवी रस्त्यावर फेकला जातो आणि तिथेच बसून तो शहराचं शोकगीत लिहू लागतो. हे उतरवताना मनोहर ओकच्या 'मुंबई मुंबई मी तुझ्यातून फाटक्या भणंगासारखा निघून जाईन' ह्या ओळी ड्रमबीटस् सारख्या कानावर आदळत होत्या. 'मुंबई तू हरवून बसलीस स्वतःची सिंफनी।किती लपवून ठेवशील आंतर्वाद्य। मला शेवटच्या बीभत्साची गाणी गायचीयेत' या नामदेव ढसाळने मांडलेल्या आकांतातला पीळ मला जाणवू लागला. शाहीर अमर शेखांच्या 'सुटला वादळी वारा।वल्हव जोमानं जरा।चल गाठू किनारा' या जोषपूर्ण गीतातल्या वादळी वाऱ्याचा विपरित अर्थ मला दिसू लागला. शाहिरांना अभिप्रेत असलेला 'क्रांतीचा वारा' आज 'भयाचा वारा' होऊन वाहत होता, जो मला एका तार्किक संगतीने अरुण कोल्हटकरांच्या 'डेंजर वाऱ्या'पाशी घेऊन आला.

ही झाली नाटकाची पहिली फेज. मध्ये तीन वर्षांची गॅप पडली. संहितेत एका ओळीची मी भर टाकली नाही; पण डोक्यात विषय धुमसत होता. मी खूप आवांतर वाचत होतो. भटकलोही. दुष्काळी प्रदेशातली स्थिती, तिथून शहरात स्थलांतर करणारी माणसं, शहरात येणारे परप्रांतातले मजूर, नाका कामगार, त्यांचं शोषण, दमन, परप्रांतांतून आलेल्यांचा स्ट्रगल हे बघताना वाचताना नाटकाचा नायक दाभाडे याच्या कथानकाबरोबर बबन येलमाये ह्या मराठवाडा-नगरकडच्या दुष्काळी भागातून मुंबईत जगण्यासाठी आलेल्या तरुणाचं उपकथानक आकार घेऊ लागलं. ह्याच आडनावाचा माणूस मला शिर्डीपासून आत ४० किमीवर असलेल्या एका दुष्काळी गावात भेटला होता. या मुख्य आणि उपकथानकाच्या दरम्यान जी माणसं नाटकात आली, त्या प्रत्येकाचीच एक गोष्ट उभी राहिली. ही सगळीच माणसं विस्थापित आहेत वा विस्थापित होण्याच्या प्रक्रियेत आहेत; मग ती दाभाडेंची मुलं असतील वा बायको असेल, त्यांच्या घरात घुसलेले गुंड असतील वा इमारतीतले अन्य लोक वा बबन येलमायेच्या आयुष्यात येणारी माणसं. यांना कोण आपल्या जागेवरून हुसकावतंय? नाटकात असा कोणताही एक चेहरा समोर येत नाही. हे जे सर्व विस्थापन चाललंय त्यामागे कुठली तरी एक अक्राळ-विक्राळ अदृश्य शक्ती आहे. तिला अनेक जबडे आहेत आणि असंख्य हात आहेत. आपला शत्रू कोण हे माणसांना ओळखता येत नाही आणि त्याचा चेहरा लेखक म्हणून मला दाखवता येत नाही.

आणि अचानक साक्षात्काराप्रमाणे एक सत्य मला गवसलं, या विक्राळ व्यवस्थेत दाभाडेसारख्या निरुपद्रवी माणसांनी नष्ट होणं हेच त्यांचं भागधेय आहे. माणूस हा मुळातच घुसखोर आहे. सगळा मानवी इतिहास घुसखोरीचा आहे आणि घुसखोरी करतच त्याने आपली इथवरची प्रगती केली आहे. लिओ टॉलस्टॉय म्हणतो, 'प्रगतीवर माणसाचा आंधळा विश्वास आहे. समग्र जीवनाचं आकलन त्याला करता येत नाही आणि ही उणीव तो प्रगतीच्या मागे लागून भरून काढतो.' ह्या प्रगतीच्या पायाखाली दडलेल्या क्रौर्यात किती दाभाडे चिरडले गेले असतील आणि कितीतरी दाभाडे यापुढेही चिरडले जातील.

मला माझं स्टेटमेंट सापडलं होतं. अतिशय दमछाक करणाऱ्या ह्या प्रदेशातून वणवण करत एका मुक्कामापाशी येऊन मी पोचलो होतो. या प्रवासात मी नाटकातल्या माणसांच्या वाट्याला आलेले सर्व त्रास भोगले. त्यांची भीती अनुभवली. प्रत्यक्षात अनेकांच्या आयुष्यात येणाऱ्या, येऊ शकणाऱ्या अशा अनुभवांना तोंड देण्याचं बळ व्यक्ती म्हणून माझ्यात नाही. कदाचित अशा अनुभवात मीही नष्ट होईन. माझ्यासारखा कुणीही नष्ट होईल. दाभाडेच्या जागी तुम्ही, मी, आपण कुणीही असू शकतो ही जाणीव निर्माण करणं एवढंच लेखक म्हणून माझ्या हातांत होतं. एक हतबलता लेखनकृतीत उतरली ती अशी.

**– जयंत पवार**

सी-८११, भूमिग्रीन, रयेजा इस्टेट,
कुलूपवाडी, बोरिवली (पूर्व), मुंबई ६६.
Mob.: 9769988984

## ओळख । मंगला आठलेकर

जयंत पवार हे माझे आवडते लेखक आहेत. 'अधांतर', 'दरवेशी आणि इतर एकांकिका', 'फिनिक्सच्या राखेतून उठला मोर', 'काय डेंजर वारा सुटलाय' आणि मासिकांतून कधीतरी प्रसिद्ध झालेल्या काही असंग्रहित कथा असं मोजकंच पण उत्तम लेखन त्यांच्या नावावर उपलब्ध आहे. त्यांच्या कथा, नाटकं वाचल्यानंतर बराच काळ कुणाचं काही वाचावंसं वाटत नाही, इतका त्या लेखनाचा प्रभाव माझ्या मनावर राहतो. 'वरणभात लोन्च्या आणि कोन नाय कोन्चा' ही त्यांची कथा वाचल्यानंतर त्यावरची प्रतिक्रिया कळवताना मी त्यांना म्हटलं होतं, की 'तुमच्या कथेची समीक्षा करण्याच्या फंदात कुणी पडू नये. तुमचं लेखन फक्त अनुभवावं. कारण पुस्तक खाली ठेवल्यानंतर भोवतालच्या भीषणतेच्या नव्या जाणीवेनं काळजाचा उडालेला थरकाप आणि मेंदूत फक्त एक सुन्न स्तब्धता..... हीच वाचकाची अवस्था असते.' जयंत पवारांनी जगण्याची केलेली मीमांसा इतकी मर्मभेदी आणि एखाद्या प्रपातासारखी आपल्यावर येऊन आदळणारी असते, ' हे बघ तुला भग्न करणारं तुझं भोवताल' म्हणत असा झटका देणारी असते, की त्यानंतर काही लिहा-बोलायचं राहत नाही. आणि आज त्यांच्या लेखनाविषयी लिहिण्याचं अवघड काम माझ्यावर सोपवलं गेलंय.

'काय डेंजर वारा सुटलाय' ह्या नाटकाच्या रंगमंचीय आविष्कारासंबंधी मी काहीच बोलणार नाही, कारण ते ज्ञान मला नाही. पण हे नाटक वाचत असताना आपण ते रंगभूमीवरच बघतो आहोत असं वाटण्याइतकी दृक्, श्राव्य, आणि वाच्य गुणवत्ता घेऊन ही लेखनकृती आपल्यासमोर येते, हे मी ते नाटक जेव्हा जेव्हा वाचते तेव्हा तेव्हा अनुभवते.

माणसाला आयुष्यात काय हवं असतं? एक साधं, सरळ, सुखी आयुष्य जगावं, आपलं स्वत:चं असं एक लहानसं का होईना घर व्हावं, इतक्या माफक सुखाची अपेक्षा करत बहुतेक माणसं आयुष्यभर राबत राहतात. पण स्वत:च्या कष्टातून उभ्या केलेल्या ह्या छोट्याशा सुखावरही त्यांचा अधिकार नसतो. मदोन्मत्त सत्ताधाऱ्यांच्या एका आदेशासरशी केव्हाही आपण लुबाडले जाऊ, हे भय बाळगतच इथं माणसाला जगावं लागतं. 'काय डेंजर वारा सुटलाय' ह्या शीर्षकापासूनच ह्या भयाची दाट छाया जाणवायला लागते. येऊ घातलेल्या वादळाची आणि त्यानंतरच्या उद्ध्वस्ततेची चाहूल नाटकाच्या नावापासूनच असा आपला कब्जा घ्यायला सुरुवात करते.

जयंत पवारांच्याच भाषेत सांगायचं तर हे नाटक 'माणसाच्या घुसखोरीचाच इतिहास आहे.' चाळी विकत घेऊन त्याजागी टॉवर बांधून मालामाल होऊ पाहणारे बिल्डर, मोठ्या फ्लॅट्चं, भरपूर पैशांचं आमिष, त्यासाठी एकमेकांच्या जीवावर उठलेली रक्ताची माणसं, हवी असलेली जागा घशात घालण्यासाठी रक्तपात घडवून आणणारी राजकारणी मंडळी, त्यांनी हाताशी धरलेले गुंड आणि घाम गाळून जगणाऱ्या सामान्य माणसांच्या सर्वस्वाची झालेली होळी....... पण या लेखकाची नजर फक्त अशा घटनांवरच स्थिरावत नाही. ती घटनेच्या तळाचा शोध घेते. ती कथा म्हणून, नाटक म्हणून समोर येते खरी;

# खूप मोठं अवसान गोळा करावं लागतं

जगण्याचं इतकं भीषण दर्शन हा लेखक आपल्याला घडवतो की ते जगणं, त्या जगण्याला व्यक्त करणारी त्याची भाषा, माणसाच्या जगण्यावर येऊ घातलेल्या कल्पनेच्याही पलिकडच्या संकटांचं भान आणि त्याचा प्रत्यय देणारा, पुस्तकातच विलक्षण सामर्थ्यानं त्यानं उभा केलेला रंगमंच... या साऱ्याला फक्त सलाम! चांगलं लिहिणारे खूप आहेत, पण जगण्याचं असं कातडं सोलून काढणारे लेखक मराठीत कमी आहेत. 'काय डेंजर वारा सुटलाय' हे नाटक वाचताना खूप मोठं अवसान गोळा करावं लागतं. अवती भवती असलेल्या ज्या भयंकराकडे आपण बघितलं न बघितल्यासारखं केलेलं असतं ते सगळं घशाखाली उतरवण्याची तयारी जयंत पवारांचं लेखन वाचताना ठेवावी लागते.

पण ती असते माणसाच्या अवघ्या जगण्याची मीमांसा. ती असते साऱ्या संस्कृतीची मीमांसा. उपभोगवादी वृत्तीमुळे सर्वत्र भ्रष्टाचार झपाट्यानं फोफावला आहे. आणि ह्या भ्रष्टाचारानं राजकारण, शिक्षणक्षेत्र, समाजव्यवस्था, माणसा-माणसांतले नातेसंबंध..... सर्वत्र असा हैदोस घातला आहे की सगळं पुरतं सडून गेलं आहे. ही सडलेली व्यवस्था जयंत पवारांच्या लेखनातून समोर येते.

लेखक जे लिहितो ते सर्व त्यानं अनुभवलेलंच असतं असं नाही. किंवा त्याला अनुभवावंच लागतं असंही नाही. वर्तमानाचा आणि त्याहीपुढे जाऊन भविष्याचा वेध घेणारा हा एक प्रातिभिक आविष्कार असतो. जयंत पवारांच्या लेखनात पेटलेली आग पाहताना ही प्रातिभिक ओळख तर पटतेच पण त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होणारी माणसाच्या जन्माच्या बरोबरीनं येणारी असहाय तडफड आणि त्या असहायतेमुळे त्याचा होणारा तीव्र दाह अनुभवताना, हे वास्तव की कल्पना याच्या विचक्षणेचीही आवश्यकता वाटत नाही. जगण्याचं इतकं भीषण दर्शन हा लेखक आपल्याला घडवतो की ते जगणं, त्या जगण्याला व्यक्त करणारी त्याची भाषा, माणसाच्या जगण्यावर येऊ घातलेल्या कल्पनेच्याही पलिकडच्या संकटांचं भान आणि त्याचा प्रत्यय देणारा, पुस्तकातच विलक्षण सामर्थ्यानं त्यानं उभा केलेला रंगमंच... या साऱ्याला फक्त सलाम!

आज जगण्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे, आनंदाच्या कल्पना बदललेल्या आहेत. सुख शोधण्याचे मार्ग बदलले आहेत.त्याचे परिणाम माणसं परस्परांना दुरावण्यात झाले आहेत; नाती तुटण्यात झाले आहेत. पैशांची भूक वाढली आहे. त्याच्या प्राप्तीचे मार्ग बदलले आहेत. वाटा वाकड्या करून निर्लज्जपणे दुसऱ्याचं सुख ओरबाडून घेताना माणसांना काही वाटेनासं झालं आहे. आचार-विचारातली भ्रष्टता कळसाला पोहोचली आहे. माणुसकी हरवली आहे. सर्वनाशाच्या अशा टोकावर आपण येऊन उभे आहोत की खाली गर्तेत कोसळण्याशिवाय दुसरा पर्याय आपल्यासमोर नाही. आणि समाजाचा हा ऱ्हास जयंत पवारांच्या लेखनात प्रतिबिंबित होताना दिसतो आहे.

१९७५ नंतरच्या काळात समाज ज्या सांस्कृतिक संक्रमणातून जात होता, त्या समाजाचं निरीक्षण अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय झालं. मग त्यात पुरुषसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीची परवड जशी आली तसंच गिरणी कामगारांचे प्रश्न आले, खेड्यांची वाताहत आली; शहरांकडे मोठ्या आशेनं वळलेले ग्रामीण तरुण आले; त्यांचे भ्रमनिरास आले; महानगरातल्या झोपडपट्ट्या आल्या; वेश्यावस्ती आली; गुंडांचा मोकाट वावर आला; सत्ताकारण आलं; अर्थकारण आलं,भ्रष्टाचार आला. संस्कृतीचा सगळा चेहरामोहराच बदलून गेला.

ह्या बदललेल्या संस्कृतीचं माणसाला उद्ध्वस्त करणारं चित्र जयंत पवारांच्या 'काय डेंजर वारा सुटलाय' ह्या नाटकात पाहायला मिळतं. इथं फक्त 'कुसुमकुंज' पाडून त्यावर टॉवर बांधला जातो; दाभाडेचं घर बळकावून त्याला त्याच्या कुटुंबियांसकट बेघर केलं जातं, एवढीच कथावस्तू नाही; तर हे नाटक म्हणजे वेगवेगळ्या स्वार्थपूर्तीसाठी सत्तेच्या जाणिवेनं मदोन्मत्त झालेली माणसं गरीबांवर कसे अत्याचार करतात; विस्थापित होणाऱ्यांची आयुष्यं कशी कोलमडून जातात, त्याची एक झलक आहे. घर बळकावलं गेलेले दाभाडे आणि त्यांचं अख्खं कुटुंब घर वाचवण्यासाठी जी केविलवाणी धडपड करतं ती पाहताना वेगवेगळ्या सरकारी योजनांत गावंच्या गावं सरकारकडून खाली केली जातात, देशोधडीला लागतात तेव्हा त्यांचं काय होत असेल, ह्या विचारानंही अंधारून येतं.

बरं, ही सगळीच माणसं अगदी निरुपद्रवी, भीत भीत जगणारी. आपली मुलं बिचारी गरीबीतही आयुष्य घडवण्यासाठी किती धडपडतायत, असा भाबडा विश्वास बाळगणारी आणि इकडे कल्पनाही नसेल अशा वाटांनी त्यांची पोरं केव्हाच दूर निघून गेलेली! आजूबाजूला घडणाऱ्या अशा घटना समाजाला नव्या नाहीत. म्हणूनच हे नाटक कुणा एका विशिष्ट दाभाडे कुटुंबाची ससेहोलपट मांडून थांबत नाही, तर सत्तेच्या खेळात विस्थापित होण्याची ज्याच्यावर वेळ येते अशा प्रत्येकाची जखम इथं उघडी होते. खरंतर जयंत पवार फक्त विस्थापितांच्या होरपळीपुरतंही बोलत नाहीत. 'जन्म दुःखाचा अंकुर....जन्म शोकाचा सागर....जन्म भयाचा डोंगर...चळेनासा' असा अरुण कोल्हटकरांच्या कवितेचा आधार घेत मनुष्यजन्माला आल्यावर आयुष्यभर त्याची काय किंमत मोजावी लागते त्याचा ताळेबंद मांडतात. आणि हा ताळेबंद मांडताना त्यांच्या हातांत शब्दांचा आसूड असतो. जातीय तणाव आणि धार्मिक तेढ ह्यांबाबतीत न्यूट्रल राहायचं, अंतर्यामी क्लीन असायचं आणि या देशाचा रिस्पेक्टेबल मिडलक्लास बनून राहायचं.' असा शब्दांचा आसूड मग नाटकभर आपल्या उघड्या पाठीवर पडत राहतो.

नाटकाच्या केंद्रस्थानी आहे सत्यविजय दाभाडे. साऱ्यांची आयुष्यं सुरक्षित करणारा हा विमाएजन्ट दाभाडे स्वत:चं आयुष्य सुरक्षित करू शकत नाही. माणसाचं आयुष्य सुरक्षित करणारी एकही पॉलिसी अस्तित्वात नाही हे मान्य करायला लावणारा सुन्न अनुभव एक दिवस त्याला येतो. माणसाच्या आयुष्याचा विमा काढून ते सुरक्षित करणं यातली हास्यास्पद विसंगती, अर्थशून्यता त्याला इतक्या भेदक रीतीनं जाणवते की तो अवाक् होतो. आपल्या डोळ्यांसमोर ठार केला गेलेला मुन्ना बघताना त्याच्या आतलं काहीतरी अशा पद्धतीनं मरून जातं की तो एकदम

गप्प होऊन जातो; त्याचा जगण्यावरचा विश्वास उडून जातो. त्याचं मूक होणं आपल्या मनात काही महत्वाचे प्रश्न निर्माण करतं. माणसं अशी इतक्या अटीतटीनं हिंसेवर कशी उतरतात? मग मानवी संस्कृती विकसित झाली म्हणजे नेमकं काय झालं? दाभाडेला वाटतं, माणसाच्या उत्क्रांतीत उपयुक्त नसलेल्या गोष्टी नष्ट होतात असं डार्विन म्हणतो खरा; पण ज्याअर्थी क्रोध, हिंसा, लढाया, राग, लोभ, हेवा, मत्सर ह्या गोष्टी आजही शिल्लक आहेत त्याअर्थी त्या उपयुक्तच असणार. जगायला मदतच करणाऱ्या असणार. आपल्याला असलं काही जमत नाही, आपण हबकून जातो याचा अर्थ आपण जगायला नालायक असणार!

शिवाजीपार्कसारख्या ठिकाणी स्वतःच्या मालकीचं घर असलेला दाभाडे 'मरताना माझे हात बांधू नका.' अशी इच्छा व्यक्त करतो. हीच इच्छा पृथ्वीराज चौहाननं व्यक्त केली होती हेही सांगतो. पृथ्वी जिंकणाऱ्या या राजाचे हात जाताना कसे रिकामे होते हे जगाला कळलं पाहिजे असं दाभाडे म्हणतो. दाभाडेची झोळीही जाताना पृथ्वीराजसारखीच रिकामी आहे. इतिहासातल्या, पुराणातल्या घटनांचे संदर्भ थेट वर्तमानाशी जोडत ह्या साऱ्याच गोष्टी आजही माणसाच्या जगण्याचा अपरिहार्य हिस्सा कसा आहेत, हे जयंत पवार स्पष्ट करतात.

'वर्तमान' अशी काही एक स्वतंत्र अस्तित्व असलेली गोष्ट नसतेच. त्याची नाळ भूतकाळाशी जोडली गेलेली असते. म्हणून तर चुका कळूनही माणसं वारंवार इतिहासाची पुनरावृत्ती करताना दिसतात. घुसखोरीच्या इतिहासाचा माग काढत जयंत पवार पार महाभारताच्या काळापर्यंत जातात. सत्तेच्या बळावर ज्या पद्धतीनं जमिनी, घरं बळकावली जातात ती अतिक्रमणं पाहताना जयंत पवार 'कृष्णार्जुनानं खांडववनाला आग लावली आणि नागवंश काही मरून गेला, काही विस्थापित झाला. इंद्रप्रस्थ नगरी नावाच्या मोठ्या टाऊनशिपसाठी झालेलं हे सामूहिक हत्याकांड, ज्याची धर्मग्रंथात गौरवपूर्ण नोंद आहे.' अशी उपहासात्मक टिप्पणी करतात.

अत्याचाराच्या अशा गौरवपूर्ण नोंदी हा आपला इतिहास आहे.म्हणूनच आजही साम, दाम, दंड, भेद अशा सर्व मार्गांचा वापर करून गरिबांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात, त्यांना त्यांच्या हक्काच्या जागेवरून दमदाटीनं हुसकावून लावलं जातं.एकदा तिथून हुसकावून लावल्यानंतर 'मरा किंवा अन्नपाण्याविना तडफडा...' कोणाच्या काळजात काही हलत नाही. कारण हीच इथली पूर्वापार चालत आलेली 'संस्कृती' आहे आणि वर्तमानात घडतंय ते ह्या संस्कृतीचं एका उद्दाम ताठ्यानं केलेलं संवर्धन आहे. 'भ्रष्टाचार' हीच या समाजाची ओळख आहे.

राजकारणात सत्तेसाठी भ्रष्टाचार, शिक्षणक्षेत्रात पैशासाठी भ्रष्टाचार, देवाधर्माच्या नावाखाली देवळात भ्रष्टाचार, रोजगार उपलब्ध नसल्यानं बेकार तरुणांच्या रस्त्यावर फिरणाऱ्या टोळ्या, भूक, वासनेचा उसळलेला आगडोंब.....एक अव्यक्त भय सर्वत्र भरून राहिलेलं आहे. माणसाला ग्रासून राहिलेल्या या भयाची तीव्र जाणीव जयंत पवारांचं लेखन आपल्याला करून देतं.




आज ज्या प्रचंड सामाजिक कोलाहलात आपला जीव घुसमटून जातोय, त्या कोलाहलाचा इतक्यात तरी शेवट होण्याची शक्यता दिसत नाही याची हे नाटक साक्ष आहे. आजघडीला आपल्या समाजाचं विदारक दर्शन घडवणारी प्रतिभावान साहित्यकृती म्हणून 'काय डेंजर वारा सुटलाय' ची नोंद घ्यावीच लागेल.

**मंगला आठलेकर**
'ऋग्वेद', ११/२ वर्धमाननगरी,
कर्वेनगर, पुणे ५२.
Mob.: 9922691650.